सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे आस्थापनेवर संगणक अभियंता ही दोन काल्पनिक पदे निर्माण करून बाह्ययंत्रणेद्वारे भरणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक राअगृ-१०१७/प्र.क्र.२७/३१,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक:- २७ जून, २०१९

वाचा :- शासन पत्र वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/ प्र.क्र.४२/आपुक, दिनांक ०६.०६.२०१९

प्रस्तावना :-

सह्याद्री राज्य अतिथिगृहातील कार्यालय व कक्षबंधांमधील संगणक, तसेच अतिथीगृहामध्ये होणाऱ्या विविध बैठकांमध्ये सादरीकरण करणे, व्हिडिओ कॉन्फरन्स इत्यादिसाठी संगणकाशी संबंधित तांत्रिक सहाय्य उपलब्ध करण्यासाठी दोन संगणक अभियंता (प्रत्येकी एक, दोन सत्रांमध्ये) बाह्ययंत्रणेमार्फत भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. त्यानुषंगाने संगणक अभियंता ही दोन काल्पनिक पदे निर्माण करून बाह्ययंत्रणेमार्फत नियुक्त करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या दिनांक ९ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये गठीत उपसमितीसमोर ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावास दिनांक ३० मे, २०१९ रोजी झालेल्या उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

शासन निर्णय :-

नवीन काल्पनिक पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यासाठी गठीत उपसमितीच्या दिनांक ३० मे, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सह्याद्री राज्य अतिथिगृहासाठी संगणक अभियंत्यांची दोन काल्पनिक पदे निर्माण करून बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यास याअन्वये मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर पदे सह्याद्री व नंदगिरी राज्य अतिथिगृह व्यवस्थापनासाठी निविदाप्रक्रीयेद्वारे नियुक्त फॅसिलिटी मॅनेजमेंट व मनुष्यबळ पुरवठ्यासाठी नियुक्त कत्राटदारामार्फत भरण्यात येतील.

२. यावरील खर्च मागणी “क्रमांक ए-४, २०५२ सचिवालय सर्वसाधारण सेवा (०९०) सचिवालय (००) (०२), सामान्य प्रशासन विभाग, राजशिष्टाचार, १० कंत्राटी सेवा, (२०५२ ०३२१) ” या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागाविण्यात यावा.

३. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ०९/०६/२०१७ अन्वये गठीत अपर मुख्य सचिव (सेवा) सा.प्र.वि. व सचिव (व्यय) वित्त विभाग यांच्या उप समितीच्या

दिनांक ३० मे, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत समितीने दिलेल्या मान्यतेस अनुसरून अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२७१६५९२४३२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Satish Karbhari Jondhale

Digitally signed by Satish Karbhari Jondhale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD Protocol, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96b5b527d7131539d3b3eb3ba523bb3514dd3d3437a78ac0f73c6d8043215729, cn=Satish Karbhari Jondhale
Date: 2019.06.27 17:03:49 +05'30'

(सतीश जोंधळे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी -

१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुबई /महाराष्ट्र-२, नागपूर.
३ .महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुबई /महाराष्ट्र-२, नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. व्यवस्थापक /सह व्यवस्थापक, सह्याद्री / नंदगिरी राज्य अतिथिगृह
६. वित्त विभाग कार्यासन सेवा-५/वित्तीय सुधारणा-१ /व्यय-४/ अर्थसंकल्प-२/१४, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. निवडनस्ती (दोन प्रती)